**प्रेस नोट** दि.१३/०६/२०१९

# मालवण पोलीसांच्या सर्तकतेमुळे लाटांच्या तडाख्यात सापडलेल्या प्रेमी युगुलाचे वाचले प्राण

---

मालवण पोलीस ठाणाच्या नजीक असलेल्या रॉक गार्डनजीकच्या खडाकाळ समुद्री लाटांच्या तडाख्यात सापडलेल्या एका प्रेमी युगुलास पोलीसांच्या सजकतेमुळे वेळीच वाचवण्यात आले यश. सदरची घटना सोमवारी दि. १०.०६.२०१९ रोजी सायंकाळी घडली.

एक प्रेमी युगुल रॉक गार्डन परिसरात खडकाळ परिसरात बसले होते. अचानक लाटांचा जोर वाढल्याने खडकाळ भागात लाटांचा तडाखा बसु लागला. त्यावेळी त्या लाटांच्या तडाख्यात दोन पर्यटक अटकल्याची माहीती मच्छीमारांनी पोलीसांना दिली. त्यावेळी पोलीस स्टेशनमध्ये तपासाकरीता राखीव असलेले पोलीस हवालदार सुभाष शिवगण, पोलीस कॉन्स्टेबल सिध्देश चिपकर,प्रतिभा जाधव,प्रविणा आचरेकर यांनी सदर घटनेच गांर्भीय लक्षात घेवुन घटनास्थळी धाव घेत त्या युवतीला व युवकाला पोलीसांनी धीर दिला व प्रसंगावधान राखत त्यांना लाटांच्या विळख्यातुन बाहेर काढले.

पोलीस कर्मचाऱ्यांच्या या कर्तव्य दक्षतेचे पोलीस अधीक्षक श्री. दिक्षीत गेडाम यांनी अभिनंदन करुन रोख स्वरुपात बक्षीस देवुन त्यांचा गौरव केला. तसेच सिंधुदुर्ग जिल्हामध्य येणाऱ्या पर्यटकांना पर्यटनाच्या दरम्यान प्रसंगावधान राखण्याचे व समुद्र किनारी राहणाऱ्या नागरीकांना वायु वादळाच्या संभाव्य धोक्यापासुन सतर्क राहण्याचे आवाहन केले.

---

पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग करीता.